नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ८७ Issue - 87 | वार बुधवार दि. १३ ऑगस्ट २०२५३ Blow- Wednesday Date 13 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## सोलापूर-पुणे-मुंबई हवाई मार्गासाठी प्रति आसन व्यावहारिक तूट निधी देण्याचा निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सोलापूर-पुणे-मुंबई हवाई मार्गासाठी उडान योजनेच्या धर्तीवर एक वर्षासाठी प्रति आसन व्यावहारिक तूट (व्हायअबिलिटी गॅप फंडिंग-व्हीजीएफ) निधी उपलब्ध करून देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.




केंद्र सरकारने सामान्य नागरिकांना विमानप्रवास परवडेल यादृष्टीने उडान (रिजनल कनेक्टिव्हिटी स्किम) योजना सुरू केली आहे. सोलापूर विमानतळासाठीदेखील ही योजना लागू होणार आहे. ही योजना लागू होईपर्यंत वर्षभरासाठी प्रति आसन ३ हजार २४० रुपये दराने (शंभर टक्के व्हिजीएफ) व्यावहारिकता तूट म्हणून निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे सोलापूर-पुणे-मुंबई हवाई प्रवास दर कमी होण्यास मदत होणार आहे.

या निर्णयानुसार सोलापूर-मुंबई आणि सोलापूर-पुणे या हवाई मार्गासाठी स्टार एअर कंपनीस दर आसनामागे हा व्यावहारिक तूट निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याकरीता १७ कोटी ९७ लाख ५५ हजार २०० रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे.

या विमानतळासाठी उडान योजना लागू झाल्यानंतर शासनाकडून देण्यात येणारा हा निधी बंद करण्यात येईल व केंद्र सरकारच्या उडान योजनेप्रमाणे २० टक्के व्यवहारिकता तूट (व्हिजीएफ) देण्यात येणार आहे.

# महाराष्ट्र पोलीस दलात १५ हजार पदभरती होणार

### मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय; लेखी परीक्षेसाठी ओएमआर प्रणालीचा वापर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र पोलीस दलातील शिपायांची सुमारे १५ हजार पदे भरण्यात येणार आहेत. त्याकरिता आज सन २०२४-२५ च्या पोलीस शिपाई भरती प्रक्रियेस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या भरतीमध्ये सन २०२२ व सन २०२३ मध्ये संबंधित पदाची विहित वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांनाही एक वेळची विशेष बाब म्हणून अर्ज करता येणार आहे व भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे.

राज्याच्या पोलीस दलात सन २०२४ दरम्यान रिक्त असलेली व २०२५ मध्ये रिक्त होणाऱ्या पदांचा आढावा घेऊन, ही भरती करण्यात येणार आहेत. भरण्यात येणारी पदांची संख्या अशी, पोलीस शिपाई - १२ हजार ३९९, पोलीस शिपाई चालक - २३४, बॅण्डस् मॅन - २५, सशस्त्र पोलीस शिपाई - २ हजार ३९३, कारागृह शिपाई - ५८०. एकूण १५ हजार, ६३१. पोलीस शिपाई व कारागृह शिपाई ही पदे गट - क संवर्गातील आहेत. पोलीस शिपाई भरती प्रक्रिया त्या-त्या जिल्हा स्तरावरून राबविण्यात येते. त्यासाठी ओएमआर (जचठ) आधारित लेखी परीक्षा घेण्यात येईल.



भरतीसाठी अर्ज मागवणे, अर्जाची छाननी, त्यावर प्रक्रिया तसेच उमेदवारांची शारिरीक परीक्षा, त्यातून पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा यासाठी अनुषांगिक प्रक्रिया राबविण्याचे अधिकार प्रशिक्षण व खास पथके विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालकांना देण्यासही बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दलातील शिपाई संवर्गाची पदे अत्यंत महत्त्वाची आहेत. पदे रिक्त राहिल्यास, पोलिसांवरील कामाचा ताण वाढतो. पोलीस दल व कारागृहातील स्थिती सुधारण्यासाठी उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयानेही वेळोवेळी ही पदे वेळेत भरली जावीत असे निर्देश दिले आहेत. लोकप्रतिनिधी, तसेच विधिमंडळातील चर्चेतही लोकप्रतिनिधींकडून ही पदे तातडीने भरण्याची मागणी करण्यात आली आहे.

## राज्यातील रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये वाढ; क्विंटलमागे १५० ऐवजी १७० रुपये मिळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकारकांना अन्नधान्य व साखरेचे वाटप करणाऱ्या रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये क्विंटल मागे २० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. त्यामुळे आता दुकानदारांना क्विंटलमागे वीस रुपयांची वाढ मिळाल्याने यापूर्वीच्या १५० रुपयांऐवजी १७० रुपये मार्जिन मिळणार आहे.



अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजना शिधापत्रिकाधारकांना ५३ हजार ९१० रास्तभाव दुकानदारांमार्फत ई-पॉस मशिनद्वारे बायोमेट्रीक पडताळणी करून अन्नधान्य, साखर व इतर वस्तुंचे वितरण करण्यात येते. या दुकानदारांना केंद्र सरकारकडून ४५ रुपये आणि राज्य शासनाकडून १०५ रुपये असे एकूण क्विंटलमागे १५० रुपये मार्जिन म्हणून दिले जात होते. या मार्जिन रकमेत वाढ करण्याची विनंती या दुकानदारांच्या संघटनांकडून करण्यात येत होती. त्यानुसार या मार्जिनमध्ये क्विंटलमागे २० रुपयांची वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली. त्यानुसार क्विंटलमागे रास्त भाव दुकानदारांना १७० रुपये (१७०० रुपये प्रति मेट्रीक टन) असे मार्जिन देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे दरवर्षी सुमारे ९२ कोटी ७१ लाख रुपयांची अतिरिक्त तरतूद केली जाणार आहे.

## मांस विक्री बंदीमुळे वातावरण तापले; उपमुख्यमंत्र्यांकडूनही निर्णयावर आक्षेप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : कल्याण डोंबिवली महापालिकेने स्वातंत्र्य दिनादिवशी मांसविक्री बंदीचा आदेश दिल्याने शहरातील वातावरण तापले आहे. त्यानंतर आता मालेगाव आणि छत्रपती संभाजीनगरमध्येही ऑगस्ट महिन्यात तीन दिवस मांसविक्री बंदीचा निर्णय लागू करण्यात आला आहे. यासह नागपूर, अमरावतीमध्येही स्वातंत्र्यदिनी ही बंदी लागू असणार आहे. महापालिकांचे म्हणणे आहे की, धार्मिक सौहार्द आणि सार्वजनिक शांततेला प्राधान्य देऊन हा निर्णय घेतला आहे. महापालिकांच्या या निर्णयावर मात्र अनेकांनी आक्षेप घेतला आहे. यातच आता उपमुख्यमंत्री अजित पवारांनीही या निर्णयावर आक्षेप नोंदवला आहे.

मुंबईमध्ये माध्यमांशी संवाद साधताना मासविक्री बंदीच्या तप्त मुद्द्यावर अजित पवारांना विचारले असता. ते म्हणाले, ज्यावेळी श्रद्धेचा प्रश्न असतो, त्यावेळी ही बंदी घातली जाते. आषाढी, महाशिवरात्री आणि महावीर जयंती अशा महत्वाच्या सणांना बंदीचे आदेश निघतात. पण आज देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्ष झाली. आपल्या देशामध्ये बहुतेक जण शाकाहारी आहेत. कोकणात साध्या भाजीतही सुकट टाकतात, हा त्यांचा आहारच आहे. त्यांचा आहार घेण्यास बंदी घालणं योग्य नाही. महत्वाच्या शहरांत अनेक जातीधर्माची लोक राहतात. भावनिक मुद्दा असेल आणि बंदी घातली तर लोकांना ते स्वीकारार्ह असतं पण महाराष्ट्र दिनाला, स्वातंत्र्य दिनी किंवा प्रजासत्ताक दिनी बंदी घातली तर अवघड ठरणार आहे.

अजित पवारांनी पुढे असेही नमूद केले की, लोकांच्या भावना महत्वाच्या आहेत. भावनेचा आणि श्रद्धेचा जेव्हा विषय येईल तेव्हा त्याचा त्या त्या अँगलने विचार करावा, अशी बंदी घालणं मात्र उचित नाही, असे मत पवारांनी व्यक्त केले. अजित पवारांच्या या भूमिकेनंतर आता राज्य सरकार याबाबत काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मांस विक्रीवरील बंदी उठवायची की तशीच ठेवायची असा पेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर उभा राहिला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस काय निर्णय घेणार हे महत्वाचे ठरणार आहे.

महापालिकांच्या आयुक्तांनी राज्य सरकारच्या मार्गदर्शनानुसारच निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवारांनी मासविक्री बंदी अयोग्य असल्याचे विसंगत विधान केल्याने निर्णय प्रक्रियेत संभ्रम तर नाही ना? असा प्रश्न उपस्थित होत आहे. मांस विक्रीवरील बंदी उठवायची की नाही? असा सुद्धा पेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर उभा राहिला आहे.

## तीन महामंडळाच्या कर्ज योजनेतील जामिनदारांच्या अटी शिथिल, शासन हमीस पाच वर्षे मुदतवाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ यांच्या विविध योजनांतर्गत कर्ज प्रकरणातील जामिनदाराबाबतच्या अटी आणि शर्तीमध्ये सुधारणा करण्यास तसेच महामंडळाना देण्यात येणाऱ्या शासन हमीस पाच वर्षांची मुदतवाढ देण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे लघुउद्योजकांना कर्ज घेण्याची प्रक्रिया आधिक सुटसुटीत होणार तसेच प्रलंबित प्रकरणे निकाली निघण्यास चालना मिळणार आहे.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाकडून स्वतःच्या आणि राष्ट्रीय महामंडळाच्या विविध योजना राबविण्यात येतात. यामध्ये मुदत कर्ज योजना, ऋण योजना आणि बीज भांडवल योजना यांचा समावेश आहे.

महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या दोन लाख रुपयांपर्यतच्या कर्ज योजनेसाठी लाभार्थ्यांच्या मालमत्तेवर किंवा एका जामिनदाराच्या स्थावर मालमत्तेवर बोजा चढविण्यास

**कर्ज प्रक्रिया सुटसुटीत होणार, प्रलंबित प्रकरणे निकाली निघण्यास चालना मिळणार**

मान्यता देण्यात आली. दोन ते पाच लाखापर्यंतच्या कर्जासाठी पूर्वी दोन जामिनदारांची अट होती. आता त्याऐवजी एका जामिनदारांची तरतूद करण्यात आली आहे. हा जामिनदार स्थावर मालमत्ता किंवा नावावर जमीन असलेला किंवा खासगी क्षेत्रातील नोकरदार किंवा शासकीय, निमशासकीय, शासकीय अनुदानित संस्थेतील नोकरदार असावा, अशी तरतूद करण्यात आली आहे. याचबरोबर लाभार्थी आणि जामिनदारांच्या स्थावर मालमत्तेवर बोजा चढविला जाणार आहे.

राष्ट्रीय अनुसूचित जाती मागासवर्ग वित्तीय विकास महामंडळ राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्तीय विकास महामंडळ यांच्या योजना राज्यातील महामंडळामार्फत राबविण्यात येतात. यासाठी राष्ट्रीय महामंडळाकडून राज्य महामंडळास कर्ज स्वरूपात निधी उपलब्ध करून दिला जातो. या कर्जनिधीमधून मुदती कर्ज योजना, बीज भांडवल योजना लघुऋण वित्त योजना, तसेच शैक्षणिक कर्ज योजना राबविल्या जातात.

या योजना राबविण्यासाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळास ६०० कोटी, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळास १०० कोटी, आणि संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळास ५० कोटी रुपयांच्या शासन हमीस पाच वर्षांची मुदतवाढ देण्यात आली. यामुळे प्रलंबित कर्ज प्रकरणे निकाली निघतील त्याचबरोबर नवीन लाभार्थ्यांनाही कर्ज मिळेल.

### वाराणसी व पंढरपूर तुलना करून विकास आराखडा नको

### अभ्यास कृती समिती नेमण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

# वारकरी संप्रदायांच्या बरोबर झालेल्या बैठकीत क्वार्टर प्रकल्पास कडाडून विरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

वारकरी संप्रदायाच्या बैठकीत महाराज मंडळींचा कोर्टात प्रकल्पास कडाडून विरोध सुवर्णमध्ये काढण्यासाठी अभ्यास कृती समिती नेमण्याची मागणी.

पंढरपूर येथील संभाव्य कॉलर प्रकल्प चांगला वादग्रस्त झाला असून मंगळवारी दिनांक १२ रोजी पंढरपूर येथील केबीपी कॉलेजमध्ये झालेल्या जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत महाराज मंडळी सह नागरिकांनी कडाडून विरोध केला.

सर्व वारकरी संप्रदाय महाराज मंडळींनी सध्याच्या प्रस्तावित विकास आराखड्यातील उध्वस्तिक करणाला ठाम विरोध दर्शवला . दिलेल्या सूचनांचे दिलेल्या भू वैकुंठ विकास आराखड्याची काय झाले आपत्ती प्रश्न करण्यात आला. नागरिकांसोबत माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी लोकांची घरे दारे पाडून कॉरिडर करण्याऐवजी नेमकं काय करणे गरजेचे आहे ही सूचना करणारी पत्र तत्कालीन जिल्हाधिकारी यांना लिखित स्वरूपात दिले होते त्या सूचना का स्वीकारल्या नाही असा प्रश्न देखील विचारण्यात आला.

विकासाला आमचा विरोध नाही फक्त तो विकास प्रथा परंपरा यांचे पालन करत वारकरी संप्रदाय व पंढरपूर नागरीक यांच्या मार्गदर्शनाखाली व्हावा. वाराणसी व पंढरपूर तुलना करून विकास आराखडा नको.



शासनाच्या विकास हा नावाच्या मुलाला आमच्या मंदिर परिसरातील भूमी नावाची मुलगी पसंत पडली तुम्ही लग्नाची मागणी घातली परंतु आम्ही नकार दिला तरीही तुम्ही सध्या फक्त मोबदला दृष्टीने बोला असे म्हणतात ते म्हणजे लग्न ठरले नाही हुंडा किती रुखवतात काय काय घ्यायचं अशी तयारी शासनाची दिसते.

पंढरपूरची मूळ रचना, संस्कृती कायम ठेवून विकास आराखडा मांडला जावा, असा विकास आराखडा तयार करण्यासाठी वारकरी संप्रदायक पंढरपूरची नागरी, लोकप्रतिनिधी प्रशासकीय अधिकारी यांचा समावेश असणारी एक पंढरपूर विकास आराखडा अभ्यास समिती नेमावी व पंढरपूरचा विकास आराखडा नव्याने तयार करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी आग्रही मागणी लिखित मौखिक स्वरूपात सर्वांनी केली.

बचाव समिती पदाधिकारी यांनी बडवे, उत्पात सेवादारी यांच्यावर झालेला अन्याय मंदिर परिसरातील नागरिकांनी या अगोदर दिलेली बलिदान यांची आठवण करून दिली व मोकळ्या पडलेल्या शासकीय जागेवर बॉर्डर सारखे प्रकल्प राबवावी लोकांची घरीदारी पाडूने तुम्ही दिलेल्या मोबदला आमच्या प्रसंगाला ही पुरणार नाही अशा भावना व्यक्त केल्या.

**के पी पी कॉलेज मध्ये झालेल्या बैठकीत मी पंढरपूरचे क्षेत्र बचाव कृती समिती व सकल वारकरी संप्रदायांच्या वतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना अभ्यास कृती समिती नेमण्यासाठी निवेदन देण्यात आले. यापूर्वी वारकरी संप्रदायांच्या वतीने एक आराखडा दिला होता त्याचे काय झाले? असा सवाल करण्यात आला. शासनाचे अधिकारी शहरातील जुने जाणते नागरिक यांची पंढरपूर विकास आराखडा अभ्यास कृती समिती नियुक्त करा याद्वारे तोडगा निघू शकतो असे आव्हान करण्यात आले.**


यावेळी कोर्टात विरोधी कृती समिती अध्यक्ष अभय से इसगावकर, रामकृष्ण महाराज वीर, चैतन्य महाराज देगलूरकर, तुकाराम चिंचणीकर, गणेश लंके, भागवत चौरे महाराज, अँड सुधीर रानडे, दत्तात्रेय नाना कवठेकर, व्यंकटेश कुलकर्णी गणेश बडवे डॉक्टर सचिन लादे, कौस्तुभ गुंडेवार, अभय कुलकर्णी मदन महाराज हरिदास, माजी नगरसेवक ऋषिकेश उत्पाद आदी उपस्थित होते.

## संपादकीय....

### निर्णयांचा धडाका

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ यांच्या विविध योजनांतर्गत कर्ज प्रकरणातील जामिनदाराबाबतच्या अटी आणि शर्तीमध्ये सुधारणा करण्यास तसेच महामंडळाना देण्यात येणाऱ्या शासन हमीस पाच वर्षांची मुदतवाढ देण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे लघुउद्योजकांना कर्ज घेण्याची प्रक्रिया आधिक सुटसुटीत होणार तसेच प्रलंबित प्रकरणे निकाली निघण्यास चालना मिळणार आहे. तसेच राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकारकांना अन्नधान्य व साखरेचे वाटप करणाऱ्या रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये क्विंटल मागे २० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. त्यामुळे आता दुकानदारांना क्विंटलमागे वीस रुपयांची वाढ मिळाल्याने यापूर्वीच्या १५० रुपयांऐवजी १७० रुपये मार्जिन मिळणार आहे. दरम्यान महाराष्ट्र पोलीस दलातील शिपायांची सुमारे १५ हजार पदे भरण्यात येणार आहेत. त्याकरिता आज सन २०२४-२५ च्या पोलीस शिपाई भरती प्रक्रियेस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या भरतीमध्ये सन २०२२ व सन २०२३ मध्ये संबंधित पदाची विहित वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांनाही एक वेळची विशेष बाब म्हणून अर्ज करता येणार आहे व भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे. राज्याच्या पोलीस दलात सन २०२४ दरम्यान रिक्त असलेली व २०२५ मध्ये रिक्त होणाऱ्या पदांचा आढावा घेऊन, ही भरती करण्यात येणार आहेत.

# ग्रामसभा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जशी लोकसभा, विधानसभा तशी ग्रामसभा. लोकसभेचे सभासद खासदार असतात. विधानसभेचे सभासद आमदार असतात. तसेच ग्रामसभेचे सभासद मतदार असतात.

माणूस १८ वर्षाचा झाला कि त्याला मतदान करण्याचा अधिकार मिळतो. मग तो प्रत्येक नागरिक आपोआपच ग्रामसभेचा सदस्य बनतो. एकदा सदस्य झाला कि तो मरेपर्यंत सदस्य असतो. ग्रामसभेला निवडणूक नाही. गावातील प्रत्येक मतदार नागरिक हा ग्रामसभेचा सदस्य आहे.

ग्रामसभेत हजर राहण्याचा, ग्राम सभेत मत, विचार मांडण्याचा प्रत्येक नागरिकाला अधिकार आहे. बहुमतांनी ठराव पास / नापास करण्याचा, मत देण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे.

जसे हे अधिकार आहेत तसेच हे अधिकार बजावण्याचे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. गावातील ग्रामपंचायत आपण सांगतो तशी चालविणे, चालते कि नाही हे पाहणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे.

ग्रामसभेत जे ठरेल, जे ठराव होतील त्याची अंमलबजावणी करणे ग्रामपंचायतीवर बंधनकारक आहे. जर ग्रामसभेला गेलो नाही, आपण सांगतो त्याप्रमाणे ठराव करून घेतले नाहीत, तर ग्रामपचायतीमध्ये ग्रामसेवक, सरपंच उपसरपंच व सदस्यांचा मनमानी कारभार चालेल.

अनेक गावात प्रत्यक्षात ग्रामसभा होत नाहीत. ग्रामसभेच्या ८ दिवस आधी लोकांच्या सह्या घेतल्या जातात, किंवा खोट्या सह्या / अगन्ठे घेतात. व सरपंच / ग्रामसेवक मनानेच खोटे ठराव घेवून पंचायत समितीत पाठवून देतात. यामुळे प्रत्यक्षात गावात फार मोठा भ्रष्टाचार होवूनही लोकांना माहिती असू शकत नाही.

वर्षातून किमान ६ ग्रामसभा घेणे ग्रामपंचायतीवर बंधनकारक आहे. ६ पेक्षा जास्त घेतल्या तर हरकत नाही.

पैकी ४ ग्रामसभांच्या तारखाही फिक्स आहेत.

२६ जानेवारी – प्रजासत्ताक दिन
१ मे – कामगार दिन
१५ ऑगस्ट – स्वातंत्र्य दिन
२ ऑक्टोबर – गांधी जयंती

या दिवशी ग्रामसभा भरविणे बंधनकारक आहे. ग्रामसभेची नोटीस हि सभेच्या तारखेपूर्वी ७ दिवस आधी बजावावी लागते. नोटीस हि ग्रामपंचायत कार्यालयात तसेच सर्वांना पाहता येईल, व सहजपणे वाचता येईल अशा ठिकाणी लावून प्रसिद्ध करावी लागते. तसेच सभेच्या ७ दिवस अगोदर व सभेच्या एक दिवस अगोदर अश दोन वेळा प्रत्येक वार्डात, वाडीत सविस्तर दवंडी हि द्यावी लागते.

सभेचा अध्यक्ष

आर्थिक वर्षातील पहिल्या ग्राम सभेचा अध्यक्ष तसेच निवडणुकीनंतरचा पहिल्या ग्रामसभेचा अध्यक्ष सरपंच असतो. सरपंचांच्या गैरहजेरीत उपसरपंच हा अध्यक्ष असतो बाकी उर्वरित ग्राम सभेचा अध्यक्ष मतदारांनी बहुमताने निवडून दिलेला व्यक्ती हा ग्रामसभेचा अध्यक्ष असतो.

ग्रामसभेत कसे बोलावे ?

ग्रामसभेत मतदारांना बोलण्याचा अधिकार आहे. मतदारांनी ग्रामसभेच्या अध्यक्षाची परवानगी घेवून बोलावे तसेच उभे राहून अध्यक्षांना अध्यक्ष महाराज असे संबोधून त्यांचेकडे पाहून बोलावे. अध्यक्षांनी सुद्धा माहिती विचारणाऱ्याकडे पाहून बोलावे.

सभेत मतदारांच्या प्रश्नाला फक्त अध्यक्षच उत्तर देवू शकतात. इतरांना उत्तरे देण्याचा अधिकार नाही.

सभेचे कामकाज

ग्रामसेवक हा ग्रामसभेचा सचिव असतो. ग्रामसभेचे इतिवृत्त सचिव तयार करून व्यवस्थित ठेवतो. मात्र त्याच्या अनुपस्थित अध्यक्ष सांगेल तो शिक्षक, तलाठी, अंगणवाडी सेविका या सारख्या शासकीय/ निमशासकीय / ग्रामपंचायत कर्मचारी तयार करील.

**अत्यंत महत्वाचे –**

पुढील ग्रामसभेत ज्या विषयांचे ठराव व्हावेत असे आपणास वाटते, त्याचे निवेदन तयार करून तसा विनंती अर्ज सभेच्या ८ दिवस आधी ग्रामपंचायतीत जमा करून त्याची पोच घ्यावी.

ग्रामसभेत ठराव मांडावा, त्यावर बहुमत घेण्यास भाग पाडावे. ठराव पास . नापास झालेला प्रोसिडिंग बुक मध्ये लिहिला कि नाही. ठराव जसा झाला तसाच लिहिला कि बदल करून लिहिला हे शिकलेल्या मुलाकडून मोठ्याने वाचून घ्यावे. अन्यथा ठराव होवूनही प्रोसिडिंग बुकात न लिहिणे किंवा चुकीचा लिहिणे हे प्रकार सर्रास घडतात.

ग्रामसभेत आपण रस्ता, पाणी, गटार, वीज, शिक्षण, आरोग्य, शौचालये, रेशन, रोजगार, घरकुले, असे कोणतेही नागरी, सार्वजनिक हिताचे प्रश्न उपस्थित करू शकतो व त्यावर चर्चा घडवून आणू शकतो व ठराव करण्यास भाग पडू शकतो.

आपण जर नियमितपणे ग्रामसभेत उपस्थित राहिलो व ग्रामसभेत सहभाग दिला व ग्रामपंचायतीच्या कारभारात हस्तक्षेप केला तर आपणास गावातील कोणत्याही अडचणीसाठी तालुका, जिल्ह्याच्या गावी जाण्याची गरज नाही.

आर्थिक वर्षातील पहिली ग्रामसभा ग्रामपंचायतीच्या कार्यालयात घेणे बंधनकारक आहे. तसेच उर्वरित ग्रामसभा इंग्रजी मुळाक्षरांच्या (अल्फाबेटिकल्स प्रमाणे) अद्याक्षरांप्रमाणे इतर वाडे, वस्तीवर घ्याव्यात.

आपण जर निवेदन दिले कि, अमुक तारखेला अमुक वाजता, अमुक या ठिकाणी ग्रामसभा घ्यावी, तर त्या प्रमाणे ग्रामसभा घ्यावी लागते.

आपण जर ग्रामसभेला गेलो तर आपला रोज बुडेल असे वाटत असेल तर आदल्या ग्रामसभेला पुढील ग्रामसभेची वेळ ठरवून घ्यावी. किंवा निवेदन देवून सांगावे.

संध्याकाळी किंवा सकाळी लवकर देखील मतदारांच्या सोयीच्या वेळेत ग्रामसभा घेणे बंधनकारक आहे.

प्रत्येक ग्रामसभेपुर्वी एक दिवस अगोदर महिलांची ग्रामसभा घेणे आवश्यक आहे. त्या सभेमध्ये पारित झालेले ठराव जसेच्या तसे ग्रामसभेने मान्य करावे लागतात.

**– संजय स्वा. किणीकर**
**Rti सोलापूर जिल्हाप्रमुख**
**(माहीती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र)**
**संस्थापक जनमाहिती सेवा समिती**

# 'लोकधारा प्रतिष्ठान' ट्रस्ट च्या वतीने सामाजिक संदेश देत जागतिक आदिवासी दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना आदिवासी संस्कृती बद्दल माहिती व्हावी ज्या क्रांतिवीरांनी जो लढा दिला त्या इतिहासाची उजळणी व्हावी त्यांची गौरवगाथा माहिती व्हावी विद्यार्थ्यांचे प्रबोधन व्हावे म्हणून १२ ऑगस्ट २०२५ रोजी भिवंडी तालुक्यातील पडघा केंद्रातील जिल्हा परिषद समतानगर, बोरीवली मराठी शाळेत 'लोकधारा प्रतिष्ठान' ट्रस्ट च्या वतीने सामाजिक संदेश देत जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला. यावेळी लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद जाधव यांनी आदिवासी संस्कृती बद्दल विद्यार्थ्यांना माहिती देत आदिवासी जीवनावर, संस्कृतीवर कविता सादर करीत विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. तर विद्यार्थ्यांनी चित्रकलेतून वारली पेंटिंग साकारली होती. मुखाध्यापिका भावना घरत यांनी विद्यार्थांना ,पालकांना आदिवासी संस्कृती बद्दल मार्गदर्शन केले.तर यावेळी लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्ट च्या वतीने आदिवासी संस्कृती टिकूया,पर्यावरण संवर्धन, स्त्री भ्रूण हत्या थांबवा, व्यसन मुक्ती, सारे शिकूया, मुलगा, मुलगी एक समान , विज्ञान समजून घेऊया अशा आशयाचे पोस्टर दाखवत सामाजिक संदेश देत जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला. यावेळी लोकधारा प्रतिष्ठान' ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद जाधव, मुख्याध्यापिका भावना घरत, अंगणवाडी सेविका विद्या जाधव, स्वयंसेवक रिया जाधव, विद्यार्थी पालक उपस्थित होते.





# स्वेरीमध्ये 'आपत्ती व्यवस्थापन' प्रशिक्षण संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'सेवा भारती'च्या वतीने गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये रविवार,दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी'आपत्ती व्यवस्थापन'या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हे प्रशिक्षण स्वेरीच्या राष्ट्रीय सेवा योजने (एनएसएस)तील स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केले.

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात केंव्हाही काहीही घडू शकते, हे नाकारता येत नाही. यासाठी स्वतःचा व समाजातील घटकांचा बचाव करणे हे आपले कर्तव्य आहे आणि त्यासाठी आपण नेहमी तत्पर असणे गरजेचे आहे. या दृष्टीने'आपत्ती व्यवस्थापन' यावर एक दिवशीय प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. स्वेरीतील विद्यार्थ्यांनी आपत्तीपूर्व तयारी, आपत्तीच्या वेळी बचाव कार्य पद्धती, प्राथमिक उपचार तसेच जनजागृती उपक्रम यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर 'सेवा भारती' चे श्रीकृष्ण पाटील व प्रमोद मोरे या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे आपत्तीच्या प्रसंगी कार्यक्षमतेने मदत करण्याच्या कौशल्यांचे प्रशिक्षण घेतले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सेवाभारतीचे पदाधिकारी,स्वेरीचे संस्थापक व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, कँम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम. पवार, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.अमोल चौंडे, डॉ. सौ. नीता कुलकर्णी, प्रा. चेतन लिमकर, प्रा. कुलदीप पुकाळे, प्रा. बाळासाहेब गडदे, प्रा.गिरीश फलमारी, इतर प्राध्यापक वर्ग तसेच मार्गदर्शक, सर्व स्वयंसेवक विद्यार्थ्यांचे या प्रशिक्षणात मोलाचे योगदान लाभले.

**सेवाभारती तर्फे केले होते आयोजन**

# भाजप तर्फे हर हर तिरंगा अभियान राबवण्यात येणार : चेतन सिंह केदार – सावंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात कार्यक्रमांमध्ये हर घर तिरंगा अभियान साजरा करण्याबाबत केलेल्या आव्हानुसार भाजप तर्फे १३ ते १७ ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा हे अभियान मोठ्या उत्साहात साजरी केली जाणार आहे. क्रांती दिनापासून ते स्वातंत्र्य दिनापर्यंत प्रत्येक घर व दुकान व कार्यालय राष्ट्रध्वज लावण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत यांनी दिली.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राज्यात स्वातंत्र्य दिनापर्यंत प्रत्येक घर दुकान व कार्यालय राष्ट्रध्वज लावण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अधिकाधिक लोकसभागासाठी बूथ स्तरापर्यंत कार्यकर्ते जनजागृती भर देणार आहेत शाळा महाविद्यालयाशी संपर्क साधून ध्वजारोहणासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे.



११ ते १४ ऑगस्ट या काळात पक्ष संघटनेच्या प्रत्येक मंडलात तिरंगा यात्रा होणार आहे १२ ते १४ ऑगस्ट दरम्यान महापुरुषांचे स्मारक, पुतळा, परिसर स्वातंत्र सैनिकाच्या स्मारक परिसराची स्वच्छता करण्यात येणार आहे देशभक्तीवर गीत तिरंगा यात्रा मिळावे सर्व ठिकाणी होल्डिंग लावून देशभक्तीचा प्रचार व वातावरण निर्मिती करण्यात येणार आहे. घरोघरी तिरंगा फडकवणे व स्मारक व पुतळ्याची स्वच्छता आणि विभिषेकी इत्यादी विविध कार्यक्रम स्वामी सासऱ्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत यांनी दिली.

**विर श्री मालोजीराजे भोसले गढीजवळ सुरू असलेले अतिक्रमण काढण्याच्या कारवाईत धक्कादायक प्रकार!**

**अतिक्रमणावरून ॲड. जावेद शेख यांचा गंभीर आरोप**

# इंदापूर येथे प्रशासनाकडून अतिक्रमण काढण्याची मोहीम









**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : जातीयवादी पद्धतीने फक्त मुस्लीम बांधवांचीच घरे जमीनदोस्त असा गंभीर आरोप स्थानिक अँड जावेद शेख यांनी केला आहे.

पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथील विर श्री मालोजीराजे भोसले गढी परिसरात प्रशासनाने अतिक्रमण काढण्याची मोहीम सुरू केली होती. अधिकृत नोंदीप्रमाणे ही कारवाई सर्व अतिक्रमित बांधकामांवर होणार होती. मात्र, प्रत्यक्षात कारवाईदरम्यान फक्त मुस्लीम कुटुंबांच्या घरांवरच जेसीबी पोकलेन फिरवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, प्रशासनाने काही घरे व दुकाने वगळून, केवळ एका विशिष्ट समुदायाच्या घरांना टार्गेट केलं.

त्यामुळे कारवाईचा हेतू आणि पारदर्शकता याबाबत गंभीर शंका उपस्थित होत आहेत.

ॲड. जावेद शेख यांनी प्रशासनावर सरळ-सरळ जातीयवादाचा आरोप केला आहे. त्यांच्या मते अतिक्रमण काढण्याच्या नावाखाली हे जे काही झालं, ते अन्यायकारक आणि एकतर्फी आहे. गढी परिसरातील इतर अतिक्रमणे तशीच उभी असताना फक्त मुस्लीम बांधवांचीच घरे उद्ध्वस्त करण्यात आली. हा प्रकार प्रशासनाच्या जातीयवादी मानसिकतेचा नमुना आहे.

या कारवाईत अनेक कुटुंबं बेघर झाली आहेत. लहान मुलं, महिला, वृद्ध व्यक्ती – सर्वजण उघड्यावर आले आहेत. पावसाळ्याच्या या दिवसात घरदार गमावलेल्यांची अवस्था अत्यंत बिकट आहे.

प्रशासनाने या कारवाईबाबत अजून कोणतंही अधिकृत स्पष्टीकरण दिलेलं नाही. मात्र या प्रकारामुळे परिसरात प्रचंड नाराजी पसरली आहे. नागरिकांची मागणी आहे की, सर्व अतिक्रमणांवर समान कायदा लागू व्हावा – मग ते कोणत्याही जाती-धर्माचे असो.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# शैक्षणिक स्पर्धा खडतर आहे, प्रयत्न करा यश मिळेल : शांभवीताई कल्याणशेट्टी

## अकरावी नवोदित विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात जगामध्ये झपाट्याने बदल होत आहेत, नवनवीन शोध लागत आहेत, शैक्षणिक स्पर्धा देखील खुप खडतर झालेली आहे, त्यासाठी कठोर परिश्रम करून ध्येय साध्य करण्यासाठी अभ्यासपूर्वक वाटचाल केल्यास यश निश्चित मिळेल असे प्रतिपादन संस्थेच्या संचालिका शांभवी कल्याणशेट्टी यांनी केले.



महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था,अक्कलकोट संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता अकरावी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. व्यासपीठावर सचिव मल्लिकार्जुन मसुती, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख पूनम कोकळगी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, जूनियर कॉलेजचे प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी व प्रा सौरभ भस्मे उपस्थित होते.

मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, महाविद्यालयाचे नियम व शिस्त विद्यार्थ्यांना बंधनकारक असते ती विद्यार्थ्यांच्या भावी जीवनास मार्गदर्शक असते म्हणून अध्ययनाची देखील शिस्त लावून घेतली पाहिजे दररोज पाठ्यपुस्तक वाचले पाहिजे, संदर्भ ग्रंथाचे देखील वाचन केले पाहिजे, त्यामुळे यशाची खात्री मिळते जीवनाची वाटचाल सुखकर होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक कु प्रती-क्षा सोलंकर यांनी केले सूत्रसंचलन कु सुकन्या स्वामी यांनी केले तर आभार श्रद्धा त्रिगुळे यांनी मानले यशस्वीतेसाठी प्राध्यापक गुरुशांत हपाळे, सलोनी शहा, सविता स्वामी, शितल फुटाणे, शितल टिंगरे, मधुबाला लोण-ारी, जनाबाई चौधरी, शिल्पा धूमशेट्टी, शिवकुमार मटदेवरू यांनी प्रयत्न केले.

### यश प्राप्तीसाठी सक्षम व्हा

**जगामधील अनेक दिग्गजानी आपल्या व्यंगावर मात करून यश मिळविले आहे. यश प्राप्तीसाठी मेहनत घ्यावी लागते. थोरामोठ्यांचे चरित्र वाचावी लागतात. त्यांचा आदर्श जोपासावा लागतो. त्यासाठी मन, मनगट आणि मेंदू बळकट असावा लागतो तरच आपण सक्षम होतो असे प्रा सौरभ भस्मे यांनी आपल्या भाषणातून सांगितले.**

# स्वा. सावरकर विद्यालय कोठुरे येथे पर्यावरण पूरक रक्षाबंधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड / प्रतिनिधी : मविप्र संचलित स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे येथे रक्षाबंधन हा भाऊ-बहीण यांचा स्नेह बंधनाचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी फुलांपासून ,पानांपासून, पाकळ्यांपासून, कडधान्यांपासून सुंदर राख्या बनवल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयातील शिक्षक किरण भडांगे यांनी केले त्यात त्यांनी विद्यार्थ्यांना बदलत्या वातावरणात पर्यावरण संरक्षण किती महत्त्वाचे आहे हे समजावून सांगितले तसेच वाढत्या गुन्हेगारी पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना बहिणी विषयी असलेल्या पवित्र नात्याचे जबाबदारीने रक्षण कसे करावे हे समजावून सांगितले. यानंतर विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील सातपुते यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात पर्यावरण जतन व संवर्धन करणे ही काळाची गरज असून विविध गोष्टीतून वाढणारे प्रदूषण व त्याचा प्रभाव कमी होण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन पर्यावरण संवर्धन करणे आवश्यक असल्याचे नमूद केले व त्याच भावनेतून वृक्षांना राखी बांधल्यास त्यांचे संवर्धन व जतन होऊन पर्यावरण संगोपनास हातभार लागला जाईल असे सांगितले त्यानंतर सांस्कृतिक समिती प्रमुख सुधाकर निकम यांच्या संकल्पनेतून शालेय स्तरा-वरील रक्षाबंधन साजरे करण्यात आले. यावेळी विद्यालयातील विद्यार्थिनी त्रिषा मोगल हिने कलाशिक्षिका गायत्री जाधव यांच्या मार्गदर्शनातून विविध बिया व धान्यांपासून बनवलेले राखी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतिक समिती प्रमुख सुधाकर निकम, कला समिती प्रमुख गायत्री जाधव ,विज्ञान छंद मंडळ समिती प्रमुख रोशन दवते यासह विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक नितीन सावकार, संजय निकम, शिवाजीराव सानप, माधव गाडे, सुनीता दाणी, अनिता पवार, अर्चना कुटे, ज्योती चिताळकर, सुरेखा कापडी, प्रियंका आव्हाड व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे विशेष सहकार्य लाभले.

# मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




अक्कलकोट : पंचायत समिती अक्कलकोट येथे आयोजित मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षा २०२५ मध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचा भव्य गौरव समारंभ उत्साहात पार पडला. या सोहळ्याला पालक, शिक्षक, मान्यवर आणि अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात विजयी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व पारंपरिक पगडी घालून गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवणारा आणि ज्ञानाची कदर करणारा असा हा प्रेरणादायी सोहळा ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे शिक्षण विस्ताराधिकारी श्री सोमशेखर स्वामी साहेब, प्रमुख पाहुणे म्हणून मा गटविकास अधिकारी श्री शंकर कवितके साहेब, अक्कलकोट दक्षिण चे पोलिस निरीक्षक मा. महेश स्वामी साहेब, अक्कलकोट उत्तर पोस्टे चे सहाय्यक पो निरीक्षक बागाव साहेब, कृषी अधिकारी श्री टिटवे साहेब, कक्ष अधिकारी श्री दयानंद परिचारक साहेब, हत्तीकणबस केंद्राचे केंद्रप्रमुख श्री सुरेश शटगार साहेब हत्तीकणबस सरपंच मा श्रीशैल माळी साहेब, ग्रामविकास अधिकारी श्री वंजारी साहेब मा. केंद्रप्रमुख श्री इस्माईल मुर्डी साहेब आदी मान्यवर उप-स्थित होते.शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी आणि शिक्षक व पालक प्रतिनिधी होते.

यावेळी वक्त्यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करत विद्यार्थ्यांना सतत स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करून उज्ज्वल भविष्यासाठी सज्ज होण्याचे आवाहन केले.

विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य व संस्थेच्या नियोजनशील कार्यपद्धतीचा मोठा वाटा असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमाचे संयोजन अत्यंत उत्कृष्टरीत्या पार पाडले गेले याबद्दल संयोजक सौं अश्विनी जाधव व मंथन परिवाराचे सर्वांनी खूप कौतुक केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री शितल डावरे सर व श्री अरुण पांचाळ सर व आभार श्री राजाराम सुरवसे सर यांनी मांडून कार्यक्रमाचा समारोप केला.

# भोर उपविभागीय पोलीस अधिकारीपदी राजेंद्रसिंह गौर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : पुरंदर : भोर उपविभागीय पो-लीस अधिकारी तानाजी बरडे यांची बदली झाल्याने, भोर उपविभागीय पो-लीस अधिकारी म्हणून राजेंद्रसिंह गौर यांनी पदभार स्विकारला आहे.

राजेंद्रसिंह गौर हे यापूर्वी आळंदी येथे सहाय्यक पोलीस आयुक्त म्हणून कार्यरत होते, या काळात त्यांनी अनेक गुन्हेगारांच्या मुसक्या आवळून सामाजिक सलोखा राखण्याचे काम त्यांनी केले आहे. आषाढी वारीसाठी आळंदी येथील पालखी बंदोबस्ताचे उत्तम नियोजन केले होते,

राजेंद्रसिंह गौर मुळचे नांदेड जिल्ह्यातील असून ते १९९२ साली पोलीस उपनिरीक्षक म्हणून त्यांनी पोलीस सेवेस सुरुवात केली, त्यांनी लातूर जिल्ह्यातील किल्लारी भूकंपात चांगली कामगिरी केली आहे राज्यातील परभणी लातूर, नांदेड या ठिकाणी लाचलुचपत विभाग, सोलापूर येथे एटीएस विभाग , औरंगाबाद येथे, स्थानिक गुन्हे शाखा, जालना क्राईम ब्रँच ,अक्कलकोट उपविभागीय पोलिस अधिकारी व त्यानंतर सहाय्यक पोलीस आयुक्त आळंदी असा त्यांचा पोलीस सेवेतील प्रवास असून, उत्कृष्ट सेवेबद्दल त्यांना राष्ट्रपती पदकाने सन्मानित करण्यात आले आहे, गुन्हेगारावरा अंकुश ठेवणारे अधिकारी म्हणून त्यांचा लौकिक आहे,

पुरंदर तालुक्यातील फोफावलेले अवैद्य धंदे, वाढती गुन्हेगारी, अनाधिकृतपणे सुरु अस-लेली खाजगी सावकारकीला पायबंद घालणे हे त्यांच्या पुढे असणारे आवाहन आहे, अवैद्य धंद्यामुळे पुरंदर तालुक्यातील सासवड व जेजुरी पोलीस प्रशासनाची डागळलेली प्रतिमा बदलण्याचे काम ही त्यांना करावे लागणार आहे.

# हॅण्डल लॉक केलेली दुचाकी पळवली

सोलापूर/प्रतिनिधी : हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३. सीएक्स.११९८ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २ ते ३ ऑगस्ट दरम्यान न्यू पाच्छा पेठ येथे घडली.याप्रकरणी श्रीकृष्ण अंबादास कस्तुरी (वय-३०, रा.चाकोते नगर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहे.

# हिंदी भाषेत विठ्ठलाची पूजा करणाऱ्या पुजारावर कारवाई करा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात हिंदी भाषेत पूजा करणारे पुजाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी मनसेने दिलीप धोत्रे यांनी केली.

मनसेच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे असे नमूद करण्यात आले की श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व तुकाराम भवन येथे तुळशी अर्चना पूजेसाठी राहुल सातपुते व त्याच्या कुटुंबीय ३० ते ३५ नागरिक उपस्थित होते. तेव्हा राहुल सातपुते यांनी आम्हाला हिंदी समजत नाही. मोबाईल आई-वडिलांना हिंदी समजत नाही. तुझीच सहभागी झालेले सर्व कुटुंब मराठी आहेत. तरी आपण सर्व स्पष्टीकरण मराठीमध्ये सांगा अशी त्या पुजारी कडे मागणी केली होती परंतु सदर पुजाऱ्याने त्याचे मागणे अमान्य करून हिंदीत पूजा सांगितले राहुल सातपुते व त्यांच्या कुटुंबियांना अपाणीत केली सदैव प्रसंग हा दुर्दैवी असून समितीच्या पुजाऱ्यावर त्वरित कारवाई करण्यात यावी. व पुढील सर्व पूजा मराठीतून कराव्यात असे. मागणीची निवेदन मधील समितीकडे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात आले. तालुकाध्यक्ष शशिकांत पाटील व शहराध्यक्ष संतोष कवडे व कार्यकर्ते उपस्थित होते.

**वाघासारखे बना म्हणजे तुमच्या वाटेला कोणी जाणार नाही : डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

# गड्डीगुड्डम छावणी येथील २२ प्रतिज्ञा बुद्ध विहारात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाचा ७२ वा वर्धापनदिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने गड्डीगुड्डम छावणी येथील २२ प्रतिज्ञा बुद्ध विहार छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे वाघासारखे बना म्हणजे तुमच्या वाटेला कोणी जाणार नाही? या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ७२ व्या वर्धापन दिनानिमित्त या प्रासंगिक विषयावर १२५ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहीक कार्यशाळा १० ऑगस्ट २०२५ ला आयोजित करण्यात आली होती.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, या भूमीला ऐतिहासिक वारसा आहे. याच परिसरातील बंगला नंबर ९ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वास्तव्य होते. तर गड्डीगुडाम येथील शिवराम जाधव यांचे वडिलोपार्जित राहत्या घरी त्यांचे कार्यालय होते. याच परिसरात ९ ऑगस्ट १९५३ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सभा आयोजित केली होती ज्यात वाघ-ासारखे बना म्हणजे तुमच्या वाटेला कोणी येणार नाही? असा ऐतिहासिक संदेश दिला होता. त्या संदेशाच्या ७२ व्या वर्धापन दिनानिमित्त आज आपण फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने १२५ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे २२ प्रतिज्ञा बुद्ध विहारात आयोजन करून ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेता येणाऱ्या पिढ्यांचे भविष्य उज्वल करण्यासाठी वर्तमानात संदर्भीय संदेश जनसामान्यांपर्यंत प्रसारित व्हावे म्हणून आम्ही त्याची जाणीव करून देत आहोत.

छोटा उद्देश ठेवणे हा गुन्हा आहे. असे महाड सत्याग्रहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते म्हणून आपण उच्च कोटीचे ध्येय बाळगून मार्गक्रमण केले पाहिजे. त्यांनी ९ जुलै १९२४ ला सुशिक्षित करा, संघर्ष करा (चेतवा), संघटित व्हा असा त्रिसूत्री संदेश दिला होता. पुढे चालून २० जुलै १९४२ ला नागपूर परिषदेत या त्रिसूत्रीचा विस्तार करताना सुशिक्षित करा, संघर्ष करा, संघटीत व्हा, आत्मविश्वास बाळगा आणि कधीही धीर सोडू नका असा पंचसूत्री संदेश दिला होता. ज्याची आपण कटाक्षाने अंमलबजावणी केली पाहिजे. नागपूर परिषदेत ५० हजार पुरुष, २० हजार महिला व ५ हजार समता सैनिक दलाचे प्रतिनिधी उपस्थित होते. तर मग आजची स्थिती काय? याचे आपण अवलोकन केले पाहिजे. २४ नोव्हेंबर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर सारनाथ येथे म्हणाले होते की, प्रत्येक बौद्धाने दर रविवारी बुद्ध विहारात गेले पाहिजे. असे असताना उपासक दर रविवारी बुद्ध विहारात येत नसतील तर त्याची कारणे शोधली पाहिजेत. त्यावर उपाययोजना करून त्यांना विहारात येण्यास भाग पाडले पाहिजे. करिता विहारात संबंधित जनतेच्या समस्याच्या निर्मूलनासाठी चर्चा करून घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केली पाहिजे. या परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक होणार आहे, असे बोलले जात आहे. पण त्या स्मारकात नेमके काय होणार आहे? याकडे पण आपण लक्ष दिले पाहिजे.

उद्घाटन पर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण देशमुख म्हणाले की, आपण सर्वांनी कार्यक्रमाला वेळेवर उपस्थित राहायला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सदरील विधान याच परिसरात केले असल्याची त्यांना माहिती नसल्याचे मान्य केले. त्या वार्डात विशेष प्रयत्नाने तेरा ठिकाणी अंगणवाड्या सुरू केल्याचे कथन केले.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना पत्रकार सुधीर खैरे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ९ ऑगस्ट १९५३ ला याच गड्डीगुड्डाम परिसरात वाघासारखे बना म्हणजे तुमच्या वाटेला कोणी जाणार नाही. हे ऐतिहासिक विधान केल्याचे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या माध्यमातून माहिती होत आहे. तरी सविस्तर वाचन करून माहिती समजून घेऊन इतरांना बाबासाहेब समजावून सांगितले पाहिजे. त्याच काळात बाबासाहेब आंबेडकरांनी येथे एखादे बुद्धविहार असावे. अशी अपेक्षा व्यक्त केली होती, जिथे आपण आज बसलेले आहोत. ब्रिटिशकाळात या भागावर निजामांचे राज्य असल्याने त्यांचा प्रभाव आजही पाहायला मिळतो.

याप्रसंगी शिक्षिका रेखा जाधव म्हणाल्या की, परिसरातील महिलांना काही विशेष उपक्रम, लघुउद्योग निर्माण करून दिल्यास त्या महिला निश्चितपणे एकत्र येऊ शकतील. नंदा वाघमारे म्हणाल्या की, त्यांना चळवळीची पुस्तके उपलब्ध करून द्यावीत, जेणेकरून सर्व महिला त्या ठिकाणी एकत्र येऊन पुस्तकांचे वाचन करू शकतील. राहुल सदाशिव बनकर म्हणाले की, विहाराचे अपूर्ण राहिलेले काम पूर्णत्वास नेले पाहिजे. पत्रकार वीरेंद्र गायकवाड म्हणा-ले की, याच छावणी परिसरातील बंगला नंबर ९ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर वास्तव्याला होते. खैरे आई सांगायच्या की कौशल्या ताई गोरे त्यांना ज्वारीची भाकरी, ठेचा व उकडलेले अंडे अशा प्रकारचे आवडीचे जेवण उपलब्ध करून द्यायची. येणाऱ्या काळात तिथे शासन स्तरावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उपलब्ध होणार आहे. उप-स्थित सर्व महिलांनी विचारपिठावर येऊन आपली ओळख करून दिली.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला व पुष्प अर्पण करण्यात आले तर २२ प्रतिज्ञा बुद्ध विहाराच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन महादेव डांबरे व प्रास्ताविक एड. विलास रामटेके यांनी तर आभार साधू आनंद यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, एड. विलास रामटेके, सुधीर खैरे, आर. डी. कांबळे, वीरेंद्र गायकवाड, साधू आनंद, एस. एन. दळवी, पी. बी. जाधव, लक्ष्मण देशमुख, अजय शिवराम जाधव, रेखा जाधव, राजश्री कांबळे, शशिकला दळवी, छाया जाधव, रमा वाघमारे, सुनंदा जाधव, महानंदा चक्रे, गीता जाधव, शोभा कंधारे, राजू बनकर, शोभा कांबळे, रमा राठोड, मीना बनकर, राहुल बनकर इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

## थोडक्यात...

### ध्वज संहितेच्या नियमाचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन

सोलापूर (जिमाका) : केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजाकरीता प्लॅस्टिकच्या वापरास मान्यता नाही. त्यामुळे प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वज निर्मितीस व विक्रीस मान्यता नाही. तसेच राष्ट्रध्वज रस्त्यावर वा अन्य ठिकाणी फेकून देवू नयेत. राष्ट्रध्वज खराब झाल्याचे आढळल्यास ते ध्वजसंहितेतील तरतूदीनुसार नष्ट करणे आवश्यक असते. राष्ट्रध्वजाचा अवमान करणे व त्याची विटंबना होणे हे बोधचिन्ह व नांवे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम १९५० व राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम, १९७१ तसेच ध्वजसंहितेच्या तरतूदीनुसार दंडनीय अपराध आहे.

तरी निवासी उपजिल्हाधिकारी तथा अपर जिल्हादंडाधिकारी या नात्याने सोलापूर जिल्हयातील सर्व जनतेस १५ ऑगस्ट २०२५ भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन समारंभ दिनानिमित्ताने हार्दिक शुभेच्छासह ध्वज संहितेच्या नियमाचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी केले आहे.

### १३ सप्टेंबरला पंढरपूरात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

पंढरपूर : महाराष्ट्र राज्य विधीसेवा प्राधिकरण, मुंबई व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर यांच्या आदेशानुसार पंढरपूर येथे १३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन केले असून, नागरिकांनी व पक्षकारांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश ए.एस. सलगर यांनी केले आहे.

सदर लोकअदालतीत मध्ये पंढरपूर येथील सर्व न्यायालयातील प्रलंबित दिवाणी दावे, निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्टस ॲक्ट च्या कलम १३८ खाली दाखल झालेली, दाखलपूर्व प्रकरणे, वैवाहीक वाद, भूसंपादन बाबतची प्रकरणे, अपघात न्यायाधीकरणाबाबतची प्रकरणे, तडजोडपत्र फौजदारी खटले तसेच महाराष्ट्र राज्य महावितरण, भारत संचार निगम, बँका, पतसंस्था यांचे प्रकरणासह ठेवण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय लोकअदालतचा नागरिकांनी पक्षकारांनी आपले प्रलंबित असलेले व दाखलपूर्व प्रकरणे सामोपचाराने मिटविणे कामी राष्ट्रीय लोकअदालत मध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन तालुका विधी सेवा समिती, पंढरपूर यांचे मार्फत करण्यात आले आहे.

# विक्रोळीत पालिका आरोग्य व्यवस्थेची तिरडी

## आंदोलना पूर्वीच डॉ. योगेश भालेराव पोलिसांच्या ताब्यात






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : मुंबई महानगर पालिकेतील रुग्णालयात रुग्णांना न मिळणारी सुविधा, अपुरे बेड, डॉक्टर आणि स्टाफ ची कमतरता या अभावामुळे रुग्णांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागते. देशातील सर्वाधिक श्रीमंत पालिका म्हणून मुंबई महानगर पालिकेचा गवगवा होत असताना मुंबईतील रुग्णालयाची अवस्था इतकी बिकट का असा सवाल करत विक्रोळीतील समाजसेवक डॉ. योगेश भालेराव यांनी पालिकेच्या आरोग्य खात्याची आज सकाळी तिरडी यात्रा काढण्याचा प्रयत्न केला. मात्र आंदोलनं होण्यापूर्वीच विक्रोळी पोलिसानी त्यांना ताब्यात घेतले. विक्रोळीतील डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय ते स्म शानभूमी पर्यंत ही तिरडी यात्रा काढण्यात येणार होती.

समाजसेवक डॉ योगेश भालेराव यांनी सांगितले की मुंबई शहरा मध्ये २/३ कोटी लोकसंख्या आहे. महापालिके अंतर्गत असलेल्या रुग्णालय मध्ये वार्ड व आय सी सी यू मध्ये तब्बल १५ हजारच्या सुमारास बेड आहेत. एवढे बेड २/३ कोटी जनतेला पुरेसे आहेत का. जी व्यवस्था वेळेवर उपचार देत नाही, रुग्णांना बेड अभावी जमिनीवर उपचार घ्यावे लागतात अशा आरोग्य व्यवस्थेचे काय करायचे. पालिकेच्या ढासललेल्या आरोग्य व्यवस्थेची आम्ही आज तिरडी आंदोलन घेतले पण पोलिसानी आमचे हे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला आहे.

# भारतीय डॉजबॉल संघात उमरगा येथील निवड झाल्याबद्दल शरद बडे यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : जपान येथे होणाऱ्या आशियाई डॉजबॉल स्पर्धे साठी भारतीय डॉजबॉल संघात उमरगा येथील कु.शरद नवनाथ बडे याची निवड झाली आहे.

दि.१२ ते १३ जुलै दरम्यान देवास (मध्यप्रदेश) येथे आयोजीत आंतरराष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धे साठी निवड चाचणी घेण्यात आली त्यामध्ये महाराष्ट्रतील पाच खेळाडूंची निवड करण्यात आली. त्यामध्ये उमरगा येथील शरद बडे याची निवड झाली.

या निवडीबद्दल महाराष्ट्र विज कामगार महासंघाच्या वतीने उमरगा येथे लातूर झोन सचिव प्रवीण रत्नपारखी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पारेषणचे उपकार्यकारी अभियंता चव्हाण, अध्यक्ष एन.के. बडे, धाराशिव मंडळ अध्यक्ष शाम आबाचने, उपाध्यक्ष विकास गाडेकर, सहसचिव विनोद कुंभार, सातय्या स्वामी, तुळजापूर विभाग अध्यक्ष अमोल पाटील, सचिव मोहन गुरव, संघटन मंत्री अनिल कोल्हे, प्रसिद्धी प्रमुख महंमद लदाफ,किरण कोळी,संदीप पवार यांच्यासह महासंघाचे पदाधिकारी, सभासद उपस्थित होते.


# उमरगा येथे महिलांची शेतीशाळा संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी : तालुक्यातील चिंचोली भुयार येथे दि. १२ रोजी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा- २ अंतर्गत सोयाबीन पिकाची महिलांची शेतीशाळा ऋऋड पच्या माध्यमातून ऑनलाईन घेण्यात आली. यावेळी उपस्थित महिला शेतकऱ्यांना सहाय्यक कृषी अधिकारी ए. एस.गायकवाड व एस. एच.सूर्यवंशी यांनी सोयाबीन पिकावरील कीड रोग व त्यावरील उपाय योजना, तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांविषयीची माहिती महिलांना देण्यात आली. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी आर एस पाटील, ए.एच.भालेराव, पी.पी.जाधव, महिला, शेतकरी उपस्थित होते.

# लोकनेते विलासरावजी देशमुख साहेब यांच्या स्मृती दिनानिमीत्त मोफत आरोग्य शिबीर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/अमर जाधव : लातूर जिल्ह्याचे सुपुत्र तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री लोकनेते आदरणीय विलासरावजी देशमुख साहेब यांच्या तेराव्या स्मृतीदिनानिमित्त लामजना पाटी येथील नामांकित जिवन ज्योत हॉस्पिटल येथे स्मृतिदिनानिमित्त भव्य सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, दरवर्षी लामजना पाटी येथील बिराजदार यांच्या जिवन ज्योत हॉस्पिटल येथे लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून गोरगरीब रुग्णांसाठी जिवन ज्योत हॉस्पिटलच्या माध्यमातून सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात येत असतं ,याही वर्षी जिवन ज्योत हॉस्पिटल चे सर्वेसर्वा डॉ विनोद कुमार बिराजदार व डॉ संगिता बिराजदार यांच्या सुसज्य संकल्पनेतून सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे , या शिबिराच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना यांचा लाभ मिळत असतो याही वर्षी सर्व रोग निदान शिबिर व रक्तदानाचे आयोजन करण्यात आले आहे तरी ,जिवन ज्योत हॉस्पिटल लामजना पाटी यांच्या वतीने परिसरातील लामजना, तांबरवाडी, जावळी, मुगळेवाडी, उत्का, चलबुर्गा, किनीनवरे, मोगरगा, आपचुंदा सह पंचक्रोशीतील रुग्णांनी या सर्व रोग निदान शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन जिवन ज्योत हॉस्पिटलच्या माध्यमातून करण्यात येत आहे,या शिबीरात रुग्णांसाठी मोफत आरौग्य तपासणी व सल्ला, रक्त तपासणी ५०% सुट. डिजीटल एक्सरे ५०% सुट ,अंतररुग्न विभाग ५०% सुट असुन .या शिबीराचा लाभ घेण्यासाठी नांव नोंदनी करने आवश्यक आहे. नाव नोंदणीसाठी खालील क्रमांकावर नाव नोंदणी करावे फोन नं.७०३८२७५४०१

शिबीराची वेळ सकाळी १० ते २

शिबीराचे ठीकाण जिवनज्योत हॉस्पीटल छत्रपती शिवाजी महाराज चौक जावळी रोड लामजनापाटी.

**गरजुंना रक्ताचा तुटवडा होउ नये यासाठी सर्वांनी रक्तदान करा डॉ. विनोदकुमार बिराजदार**

**निफाड येथे कॉंग्रेसच्या आढावा बैठकीत कार्यकत्यांचा राडा**

**तालुकाध्याक्षाची निवड ही निष्ठावत व माजी पदाधिकार्याना विश्वासात घेऊनच करावी**

# निफाड तालुक्यातील कॉंग्रेसच्या निष्ठावंताकडून तालुकाध्याक्षाच्या गैर कारभाराचे बैठकीत वाभाडे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी/राजेंद्र थोरात : निफाड प्रतिनिधी गेल्या काही वर्षांपूर्वी तालुक्यात कॉंग्रेसचे असणारे एकहाती वर्चस्वाला स्थानिक गटबाजीने छेद देत नेते आणि कार्यकर्त्यांनी कुरघोडीच्या राजकारणाला पसंती देण्याबरोबरच सोयीच्या राजकारणाचा कित्ता गिरविणे सुरू केल्याने तालुक्यात कॉंग्रेस पक्ष विकलांग झाला आहे. सुंभ जळाला पण पीळ जात नाही या उक्तीप्रमाणे यातून नेते, कार्यकर्ते धडा घ्यावयास तयार नाही. दोन दिवसांपूर्वी पक्षनिरीक्षक ब्रीजकिशोर दत्त आणि प्रदेश उपाध्यक्षांच्या राजाभाऊ पानगव्हाणे, नाशिक शहराध्यक्ष आकाश छाजेड डोळ्यादेखत निफाड कॉंग्रेस कमिटीत दोन गटांत झालेली हमरीतुमरी अन् चप्पलफेक बघता पक्षनेते आणि कार्यकर्ते यातून काही धडा घेतील, असे वाटत नाही.

सध्या तालुक्यात कॉंग्रेसची पूर्णतः वाताहत होत असतानाही पक्षाच्या बैठकीमध्ये त्याबाबत उपाययोजनांवर चर्चा करण्यापेक्षा एकमेकांची उणीदुणी काढण्यातय धन्यता मानली जात असल्याने यावर वेळीच उपाययोजना केल्या नाही. तालुक्यात कॉंग्रेसचा एकही उमेदवार उभे राहण्याचे साहस करेल की नाही, याबाबत शंका उपस्थित केली जात आहे. प्रदेश कॉंग्रेसचे उपाध्यक्ष राजाराम पानगव्हाणे यांचे तालुक्यात त्यांच्याच जिल्हाध्यक्षपदाच्या कार्यकाळात निफाडच्या शिवाजी चौकात कॉंग्रेस कमेटीची भव्य वास्तू सन २००५ साली उभी राहिली, साहजिकच या वास्तूच्या माध्यमातून पक्षाला उत्पान्नाचा स्रोत मिळू लागला. कॉंग्रेसचे दिगंबर गिते, सुरेश दाते, मधुकर शेलार, प्रकाश अडसरे यांच्यासारखी मंडळी जेव्हा तालुकाध्याक्ष पदावर कार्यरत होती तोपर्यंत पक्ष थोड़ाफार तरी शिल्लक होता. मात्र, अलीकडे हायकमांडकडून तालुकाध्यक्षपद लादले जाऊ लागल्याची भावना कार्यकत्यांमध्ये तयार झाल्याने या पक्षाचा जनाधार कमालीचा कमी होत गेला. त्यातच मागील दोन वर्षापूर्वी मधुकर शेलार यांना कोणतीही नोटीस न देता त्यांना तालुकाध्यक्षपदावरून पायउतार करीत. कसबे सुकेणे येथील विजय जाधव उर्फ बाबूराव महाराज यांची १ ऑक्टोबर २०२३ ला तात्कालीन प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी त्यांची या पदावर नियुक्ती केली. मात्र, ही नियुक्ती करताना पक्षाचे कोणत्याही कार्यकत्यांचे मत विचारात घेतले गेले नाही. त्यामुळे तालुक्यात नाराजीची भावना असतानाच, कॉंग्रेस कमिटीची स्टेट बँकेत असणारी ३ लाख ९५ हजारांची रकम तसेच माजी अध्यक्ष मधुकर शेलार यांच्याकडून ६५ हजार रुपये आणि गाळा धारक यांचेकडून भाडेपट्ट्याचे दिलेल्या एक लाख २६ हजार असे एकूण ५ लाख ८६ हजार रुपये काढल्याचा आरोप जुन्या निष्ठावंत कार्यकत्यांनी केला अन् नुकत्याच कॉंग्रेस कमिटीत पक्षाच्या निरीक्षकांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हाच वाद उफाळून आला.मुळात ज्यांचे पक्षाशी काही देणेघेणे नाही, अशांना पदाची खिरापत बाटल्याने निष्ठावंत नाराज होणे स्वाभाविक होते, तर याच बैठकीत महाराज यांनी दोन वर्षात पक्ष कसा वाढविला हे सांगण्याचा प्रयत्न केला.मात्र, कॉंग्रेस कमिटीच्या नावावर असलेल्या रक्कम हडप केली, याचा धातूरमातूर हिशेब दिल्याने मोठा भ्रष्टाचार झाल्याने समजताच थेट त्यांच्या दिशेने चप्पल भिरकवण्याचा प्रयत्न करण्यात आला त्यावेळी उपस्थित शिरीष कोतवाल यांनी प्रकरण शांत करण्यासाठी दोघांचीही समजूत काढली. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष दिगंबर गिते, सेवादलाचे प्रकाश अडसरे यांनी तर पक्षाच्या आजपर्यंत वाटचालीचा लेखाजोखा मांडत चाललेला प्रकार बरोबर नसल्याची खंत बोलून दाखविली, तर ज्येष्ठ नेत्या निर्मलाताई खर्डे यांनीही ज्येष्ठांना निर्णयप्रक्रियेत विचारले जात नसून, तालुकाध्यक्ष नेमताना पक्षातून सक्रिय कार्यकर्त्यांचा विचार केला पाहिजे, असे मत व्यक्त केले. तालुक्यात पक्षाचे महाभारत कोठपर्यंत पोहोचले याची कल्पना आल्याने अखेर नवीन अध्यक्ष निवडीवर शिक्कामोर्तब करुन नवीन तालुकाध्यक्ष निवडीचे सर्व अधिकार प्रदेश उपाध्यक्ष राजाराम पानगव्हाणे यांच्यावर सोपविण्यात आल्याचा निर्णय घेण्यात आला. साहजिकच आता कॉंग्रेसच्या तालुकाध्यक्षपदावर कोणाची वर्णी लागणार, याबाबत वेगवेगळे तर्कवितर्क लढविले जात आहेत.पक्ष विकलांग होत असताना, त्यावर उपाययोजना करून पक्षाची ताकद वाढविण्यासाठी ठोस उपाययोजना होणे गरजेचे होते. मात्र, त्याकडे लक्ष न दिल्याने आणि सोपीच्या राजकारणाचा किता गिरविला गेल्याने सध्या तालुक्यात पक्ष अस्तित्वहीन झाला आहे. आता वरिष्ठ पक्षाला कशा प्रकमे उभाती देण्याचा प्रयत्न करतात हे पाहणे गरजेचे आहे.

### चुकीच्या युत्या, आघाड्या नडल्याची भावना

**मुळात कॉंग्रेसची ज्या वेळी तालुक्यात एकहाती सत्ता होती, त्यावेळी तालुक्यातील नेत्यांनी इतर पक्षांशी युती, आघाडी करुन सत्ता उपभोगण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यामुळे पक्षाचे काही निष्ठावंत कार्यकर्ते दुखावले गेले. त्यातच पक्षाचे कामदेखील कमी होत गेले. आज तालुक्यात अवधा एक नगरसेवक असून तो देखील स्वकर्तृत्वावर निवडून आलेला आहे. पक्षाची होणारी वाताहत थोपविण्यासाठी खरे तर वरिष्ठांनी लक्ष देगे गरजेचे आहे. पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष पानगव्हाणे यांचा हा तालुका असून, त्यांच्या पक्षात अशी अवस्था असेल, तर इतर ठिकाणची परिस्थिती न विचारलेली बरी.**

**राष्ट्रीय कॉंग्रेसच्या निफाड तालुका अध्यक्ष विजय जाधव उर्फ बाबुराव महाराज यांची निवड व नियुक्ती करताना तत्कालीन प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांनी यांनी तालुक्यातील माजी पदाधिकार्याना व निष्ठावंताना कोणत्याही प्रकारे विश्वासात न घेतले नाही वरिष्ठ पातळीवरुन झालेली निवड अतिशय चुकीच्या व्यक्तीची झाली असुन विजय जाधव हे नियुक्ती पुर्वी पक्षाच्या कोणत्याही कार्यक्रमाले उपस्थित नव्हते झालेली निवड निष्ठावंताच्या दृष्टीने अतिशय वेदनादाई होते सदर निवड रद्द करुन नविन निवड जिल्ह्यातील निष्ठावंताच्या माध्यमातून व्हावी वरिष्ठ पातळीवरुन हस्तक्षेप होऊ नये.**

**– सचिन होळकर**
**सरचिटणीस– नाशिक कॉंग्रेस कमेटी**